# राज्य शासनाची दक्षिण अधिछात्रवृत्ती

| क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| १ | योजनेचे नांव | **राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती** |
| २ | योजने बद्दलचा शासन निर्णय | क्रीडा व सेवायोजन विभाग, शा.नि. क्र. एससीएच-१०६५-यु, दिनांक १९ सप्टेंबर, १९६५. |
| ३ | योजनेचा प्रकार/स्वरुप | शासकीय विज्ञान संस्था / महाविद्यालय तसेच विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या आवेदन पत्रानुसार विहित केलेल्या मंजूर संचाच्या (एकूण मंजूर संच – ७६) प्रमाणात शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी ही योजना लागू आहे. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतेलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास्तव पात्र आहेत.<br>२. विद्यार्थ्यांचा अर्ज संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना संबंधित महाविद्यालयामार्फत ३० सप्टेंबर पूर्वी पोहोचणे आवश्यक आहे.<br>३. विद्यार्थ्यांचे अभ्यासातील समाधानकारक प्रगती अहवालानुसार दुसऱ्या वर्षाचे नुतनीकरण मंजूर केले जाते. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत.<br>२. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.<br>३. महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |
| ८ | दिल्या जाणाया लाभाचे स्वरुप | नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस शा.नि.०५.०२.२००४ प्रमाणे प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १०००/- तथापि, नुतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रति माह १०० प्रमाणे रक्कम रु. १२००/- |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | उच्च शिक्षण संचालनालयामार्फत त्यांचे अधिनस्त संबंधित महाविद्यालयास/अकृषि विद्यापीठांस माहे जुलै मध्ये परिपत्रकाद्वारे सदर योजनेचा माहिती, अर्ज करण्याची प्रक्रिया/अर्जाचा नमुना पाठविण्यात येतो. विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज ऑफलाईन पध्दतीने आवश्यक सहपत्रांसह महाविद्यालयामार्फत / विद्यापीठांमार्फत उच्च शिक्षण संचालनालयास ३० सप्टेंबर पुर्वी सादर करणे आवश्यक आहे. |
| १० | अंदाजे प्रक्रियेला लागणारा वेळ | अर्ज भरण्याची प्रक्रिया साधारणपणे माहे जुलै मध्ये सुरु होते. सदर अर्जाची विविध स्तरांवरील छाननी होऊन शिष्यवृत्तीची रक्कम माहे फेब्रुवारी - मार्च मध्ये विभागीय संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेद्वारे महाविद्यालयास/विद्यार्थ्यांस वितरीत होते.<br>(कालावधी : ऑगस्ट ते मार्च – ८ ते ९ महिने) |
| ११ | संपर्क कार्यालयाचे नाव व पत्ता | उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, ससून सर्वोपचार रुग्णालयाजवळ, पुणे स्टेशन, पुणे -४११ ००१. |
| १२ | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | सदर योजना ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येते. |